**प्रेस नोट          दिनांक १३/०३/२०१९**

## खडक पोलीस ठाणे पुणे शहर

## बॅंकेचे सह्या केलेले चेक असलेल्या गहाळ बॅगेच्या मालकाचा शोध घेऊन चेकसह बॅग सुखरुप परत

दिनांक ११/०३/२०१९ रोजी फडगेट बीट मार्शलवरील दिवसपाळी कर्तव्यावरील कर्मचारी पोशि ७७२५ तावरे व पोशि ७६७६ कांबळे हे पेट्रोलिंग करीत असताना, प्यासा हॉटेल समोरील बस स्टॉपवर त्यांना एक बेवारस काळ्या रंगाची बॅग सापडली. सदर बॅग त्यांनी फडगेट चौकीस आणुन, पोशि ७७२४ पवार यांचे ताब्यात दिली. नमुद कर्मचारी यांनी सदर बॅगची तपासणी केली असता, त्यामध्ये वेगवेगळ्या बॅंकेचे सह्या केलेले बेअरर चेक आढळुन आले. सदर बॅगेतील कागदपत्रांची पाहणी करीत असताना, त्यामध्ये मिळुन आलेल्या मोबाईल क्रमांकावर फोन केला असता, चंद्रशेखर मेमन नावाच्या व्यक्तीने फोन रिसीव्ह केला. नमुद व्यक्तीस मिळुन आलेल्या बॅग व चेक्स बाबत चौकशी करता, त्यांनी सदर बॅग मंडई परिसरामधुन गहाळ झाल्याचे सांगितले. नमुद व्यक्ती चंद्रशेखर मेमन, वय ६५ वर्षे, रा. तळेगाव दाभाडे, पुणे हे फडगेट पोलीस चौकी येथे आले असता, त्यांच्याकडे चेकबाबत शहानिशा करुन, सदर चेक्स त्यांचेच असल्याची खात्री झाल्याने सदर बॅग चेकसह चंद्रशेखर मेमन यांच्या ताब्यात देण्यात आली.

ता. १३/०३/२०१९

**(राजेन्द्र मोकाशी)**
वरिष्ठ पोलीस निरीक्षक,
खडक पोलीस ठाणे, पुणे शहर